# प्रेस नोट

दि १२/४/२०१८ रोजी श्री कोंडीबा मारुती धिवार वय ६६ वर्षे (ज्येष्ठ नागरीक) रा. ३१/१ चौधरी नगर धानोरी पुणे हे सेवालाल चौक येरवडा पुणे या ठिकाणी हातगाडीवर भाजी खरेदी करीत असताना सराईत गुन्हेगार अमोल जिवराज पिल्ले रा. जयजवाननगर येरवडा पुणे याने त्यास तुला कशाला पैसे लागतात असे म्हणुन त्याचेंकडील रोख ५५००/- रुपये जबरदस्तीने काढुन घेतलेबाबत येरवडा पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि नं २५४/२०१८ भा द वि कलम ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला होता सदर गुन्हयाचा तपास श्री सुर्यकांत मारोडे सहा पोलीस निरीक्षक लक्ष्मीनगर चौकी यांनी करुन आरोपी नामे अमोल जिवराज पिल्ले वय ३८ वर्षे रा. जयजवाननगर येरवडा पुणे यास दि १३/४/२०१८ रोजी अटक करुन त्याचेकडे तपास करुन त्याने चोरलेले रोख ५५००/- रुपये जप्त करुन गुन्हयाचा सखोल तपास करुन लागलीच आरोपी विरुध्द मा न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते

यातील आरोपी अमोल जिवराज पिल्ले याचा मा न्यायालय सो यांनी जामीन मंजुर न करता त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्ये न्यायधिन बंदी करुन सदर केसची लागलीच सुनावणी करणेचे निर्देश दिल्याने श्री राजकुमार वाघचवरे वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा पोलीस स्टेशन यांनी पैरवी अधिकारी श्री कांबळे पोलीस उप निरी पो ना भारमल, पो कॉंस्टे राहुल शिंदे यांना सुचना देवुन मार्गदर्शन करुन, त्यांचेकरवी, गुन्हयातील फिर्यादी साक्षीदार पंच साक्षीदार यांची साक्षची पुर्व तयारी करुन घेवुन मा न्यायालयात वेळत हजर केले असुन श्री वामन कोळी पोलीस प्रॉसिक्युटर न्यायालय क्र ५ पुणे यांनी मा न्यायालयासमक्ष सबळ व पुरक पुरावा आणल्याने नमुद आरोपी याने सदर गुन्हा केल्याचे सिध्द झाल्याने मा श्री जी के नंदनवार सो प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो न्यायालय क्र ५ पुणे यांनी त्यास, १ वर्षे कारावासची शिक्षा सुनावली आहे.